# DIRECTROR, SPORTS & PHYSICAL EDUCATION ,
# RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY, NAGPUR

( Estiblished by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated 1st of August 1923 & presently a State University governed by Maharashtra University Act 1994)

**Dr. Sharad Suryawanshi**
Director

R. B. D. Laxminarayan Campus, Law College Square, Amravati Road, Nagpur

Office Phone & Fax No. 0712-2531696, Mobile No. 9850303154, E-mail : departnmu@yahoo.in


जा.क्र. क्रीशाशिवि/अ.महा.स्पर्धा/2021-22/548
दिनांकः 22/11/2021

प्रति,
मा. प्राचार्य/विभाग प्रमुख
संचालित व संलग्नीत महाविद्यालये तथा पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर.

**विषय- कोव्हीड –१९ चे पार्श्वभूमीवर परिस्थिती सामान्य होईपर्यंत शैक्षणिक सत्र २०२१–२०२२ मध्ये आयोजित होणाऱ्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, निवड चाचण्या, प्रशिक्षण वर्ग आणि आंतर विद्यापीठ स्पर्धेत निवड होणाऱ्या खेळाडूंकरिता सहभागी होतांना घ्यावयाची काळजी, अवलंबावयाची कार्यपद्धती आणि करावयाच्या उपाययोजना संबंधी पुढील स्वतंत्र सूचनेपर्यंत लागू करावयाचे सर्व समावेशक परिपत्रक..**

संदर्भ - केंद्र/राज्य/स्थानिक स्वराज्य संस्था/मा. जिल्हाधिकारी अथवा त्या–त्या शहरातील शासनाचे संबंधित प्राधिकृत अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले कोव्हीड-१९ संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना या संबंधीचे नवीनतम आदेश/परिपत्रके.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, नुकतेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ संघाने अखिल भारतीय तसेच आंतर विभागीय आणि खेलो इंडिया–२०२२ स्पर्धासंबधीचे परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकानुसार आपल्या विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या खेळाडूंना या स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखविण्याची संधी प्राप्त व्हावी या हेतूने विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाने आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, निवड चाचण्या आणि प्रशिक्षण वर्ग सोबत स्वतंत्ररित्या जोडलेल्या नमूद अटींचे आधिन राहून आयोजित करण्याचे योजिले आहे.

या स्पर्धा, निवड चाचण्या आणि प्रशिक्षण वर्ग हे विद्यार्थ्याचे क्रीडा भवितव्याशी निगडित असल्याने त्या यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक शारीरिक शिक्षण, विविध विषयांचे अध्यापक, प्रशिक्षक आणि क्रीडा सं घटनांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

या पत्राद्वारे आपणास विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेले कोव्हीड – १९ पार्श्वभूमीवर शैक्षणिक सत्र २०२१–२०२२ मध्ये आयोजित होणाऱ्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, निवड चाचण्या, प्रशिक्षण वर्ग आणि आंतर विद्यापीठ स्पर्धेत निवड होणाऱ्या खेळाडूंकरिता परिस्थिती सामान्य होईपर्यंत सहभागी होत असतांना घ्यावयाची काळजी, अवलंबावयाची कार्यपद्धती आणि करावयाच्या उपाययोजना संबंधी पुढील स्वतंत्र सूचनेपर्यंत लागू करावयाचे सर्व समावेशक परिपत्रक सर्व संबंधिताचे निदर्शनास आणून सहकार्य करावे, ही विनंती.

(डॉ. शरद सुर्यवंशी)
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

प्रतिलिपी माहितीस्तव –

१) मा.डॉ. सुभाष चौधरी, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.डॉ. संजय दुधे, प्र–कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहीतीस्तव सविनय सादर.
३) सर्व सन्मामनीय सदस्य, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) मा.डॉ. राजु हिवसे, कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहीतीस्तव सविनय सादर.
५) श्री. सुनील गावंडे, एकत्रीत वेतन कर्मचारी, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी योग्य ती कार्यवाही घ्यावी.

**कोव्हीड १९ पार्श्वभूमीवर आयोजित होणा-या शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ मध्ये आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा, निवड चाचण्या, प्रशिक्षण वर्ग आणि आंतर विद्यापीठ स्पर्धेत निवड होणा-या खेळाडूंकरिता परिस्थिती सामान्य होईपर्यंत**

**सहभागी होत असतांना घ्यावयाची काळजी, अवलंबावयाची कार्यपद्धती आणि करावयाच्या उपाययोजना संबंधी पुढील स्वतंत्र सूचनेपर्यंत लागू करावयाचे सर्व समावेशक परिपत्रक**

## आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा

१) १७ ते१८ वयोगटातील संभाव्य खेळाडूंनी अवलंबावयाची कार्यपद्धती.

अ) कोणताही खेळाडू या वयोगटात मोडत असल्यास आणि त्याचे दोनही अथवा एक लसीकरण झाले नसल्यास सदर खेळाडू हा स्पर्धेत सहभागी होण्यापासून वंचित राहू नये म्हणून त्याने आंतर महाविद्यालयीन स्पर्धा / थेट निवड चाचण्या / प्रशिक्षण वर्ग या ठिकाणी उपस्थित राहत असतांना वेळापत्रकातील नमुद तारखेच्या ४८ तास अगोदर कोविड़ बाधीत नसल्यासंदर्भातील आर.टी.पी.सी.आर टेस्ट रिपोर्ट हा स्वखर्चाने काढून महाविद्यालयाचे क्रीडा संचालकांना सुपूर्द केल्याशिवाय त्यांना आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी करून घेतले जाणार नाही.

ब) एखाद्या विद्यार्थ्यांची लसीकरणाची एक मात्रा पूर्ण झाली असल्यास त्यालाही वर नमुद क्र.१ मधील कार्यवाही लागू राहील.

क) ज्या विद्यार्थ्यांचे दोन्हीही लसीकरणाचा मात्रा पूर्ण झाल्या असल्यास त्याने महाविद्यालयांच्या क्रीडा संचालकांना पात्रता तक्ता तयार करतेवेळी दोनही लसीकरणाच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सुपूर्द करून महाविद्यालयाच्या क्रीडा संचालकांनी पात्रता तक्त्यामध्ये सदर खेळाडूंचे नावासमोर Remarks या रकान्यामध्ये पात्र / Eigitle असा उल्लेख करून सर्व लसीकरणाच्या प्रमाणपत्रासह परिपूर्णरित्या भरलेला पात्रता तक्ता १० वी व १२ वीचे बोर्ड प्रमाणपत्र (प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यास १२ वीचे बोर्ड प्रमाणपत्र उपलब्ध झाले नसल्यास १२ वीच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत) महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वाक्षांकित केलेले छायाचित्रासह असलेले महाविद्यालयाचे आणि परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्रासह पात्रता तक्ता आयोजक महाविद्यालयाच्या स्पर्धा प्रमुखांना सुपूर्द करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय त्या महाविद्यालयाला व खेळाडूंना आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रवेश दिला जाणार नाही.

२) आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी स्पर्धा प्रमुखांनी अवलंबावयाची कार्यपद्धती.

अ) कोविड पार्श्वभूमीवर आयोजक महाविद्यालयाच्या स्पर्धा प्रमुखांची जबाबदारी खुप महत्वाची आहे.

ब) सर्वप्रथम स्पर्धा प्रमुखांनी भाग्यपत्रकात नमुद संघ मैदानावर हजर झाल्यास त्यांचा पात्रता तक्ता, लसीकरणाच्या प्रमाणपत्रासह परिपूर्णरित्या भरलेला पात्रता तक्ता, १० वी व १२ वीचे बोर्ड प्रमाणपत्र (प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यास १२ वीचे बोर्ड प्रमाणपत्र उपलब्ध झाले नसल्यास १२ वीच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत) महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वाक्षांकित केलेले छायाचित्रासह असलेल्या महाविद्यालयाचा पात्रता तक्ता तपासावा व त्यानंतरच सामना अथवा स्पर्धा आरंभ कराव्या यात आयोजक महाविद्यालयाच्या स्तरावर कुठलाही कसूर होणार नाही याची दक्षता स्पर्धा प्रमुखांनी घ्यावी.

क) आयोजनाच्या स्थळी योग्य शारीरिक अंतर राखणे, वापरण्यात येणारे उपकरणे आणि साहित्य यांचे संभाव्य निर्जंतुकीकरण, कोविड नियमांचे पालन करण्यासंदर्भात सातत्याने ध्वनिक्षेपकावरून आवाहन करण्याची कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

ड) स्पर्धा प्रमुखांनी त्यांच्या विभागावर / स्पर्धेत ज्या चमू प्रथम चार क्रमांक प्राप्त करतील त्या संदर्भातील स्पर्धा अहवाल, पात्रता तक्ता त्यासोबत सदर महाविद्यालयांनी आयोजक महाविद्यालयांना सुपूर्द केलेली खेळाडूंची लसीकरणाची प्रमाणपत्रे ही विभागाला स्पर्धा संपल्यानंतर त्वरित सुयोग्य हस्तांतरित करणे अनिवार्य राहील.

ई) स्पर्धा प्रमुखांनी लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण झालेल्या खेळाडूंना निवड चाचणीत उपस्थित राहण्याकरिता आवश्यक असलेले शिफारस पत्र पूर्ण खात्री करून द्यावे. एखादा विद्यार्थी 10 ते १८ वर्ष वयोगटामध्ये मोडत असल्यास आणि त्याचे प्रदर्शन योग्य वाटत असल्यास त्याला सदर शिफारस पत्र सुपूर्द करीत असतांना या खेळाडूला निवड चाचणीच्या ४८ तास पूर्वी कोविड बाधित नसल्याचे प्रमाणपत्र आर.टी.पी. सी. आर. टेस्टसह सादर करावे लागेल या सूचना देखिल स्पष्टपणे द्याव्या, त्याशिवाय या वयोगटातील विद्यार्थ्यांना निवड चाचणीचे शिफारस पत्र देण्यात येऊ नये.

३) खेळाडू पात्रतेच्या अटी.

अ) FISU या संघटनेने लागू केलेल्या अखिल भारतीय विद्यापीठ संघाने मान्य केलेल्या खेळाडू पात्रतेनुसार यंदाचे शैक्षणिक वर्षापासून पुढील बदल होईपर्यंत ज्या खेळाडूंचे वय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेच्या आरंभापुर्वी/थेट निवड चाचणीच्या आरंभापुर्वी १७ वर्ष पूर्ण नसेल असा खेळाडू हा स्पर्धा/निवड चाचण्यामध्ये सहभागी होऊ शकणार नाही.

ब) तसेच ज्या खेळाड़चे वय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेच्या आरभांपूर्वी/थेट निवड चाचणीच्या आरंभापूर्वी २६ वर्ष पूर्ण झाले असेल असा खेळाडू हा स्पर्धा व निवड चाचण्यामध्ये सहभागी होऊ शकणार नाही.

क) याशिवाय कोविड लसीकरण प्रमाणपत्राच्या वर नमुद १ व २ मधील सुचनांचे तंतोतत पालन न करणाऱ्या खेळाडूंना सहभागी करून घेतले जाणार नाही

ड) परिशिष्ट-अ आणि ब मध्ये नमुद असलेले प्रमाणपत्र सर्व खेळाडूंकडून भरून घेऊन आयोजक महाविद्यालयाच्या स्पर्धा प्रमुखांना ते सुपूर्द केल्याशिवाय कोणत्याही खेळाडूला स्पर्धेत सहभागी करून घेतले जाणार नाही.

**<u>निवड चाचणीदरम्यान निवड समितीने अवलंबावयाची कार्यपद्धती</u>**

१) निवड चाचणीदरम्यान निवड समितीचे अवलंबावयाची कार्यपद्धती

अ) सर्वप्रथम निवड समितीने सर्व उपस्थित खेळाडूंची हजेरी घेऊन ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरणाच्या दोन मात्रा पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यांनी महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सही शिक्क्यासह सादर केलेल्या पात्रता तक्त्याचे संकलन करावे आणि कोविड लसीकरणाच्या प्रमाणपत्रांची छाननी करावी.

ब) १७ से १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी वर नमुद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा.

क) निवड चाचणीच्या सभेत उपस्थित राहतांना जी चमू/वैयक्तिक खेळाडू विद्यापीठ संघात निवडीची शिफारस केली जाणार असेल अशा खेळाडूंच्या लसीकरणाच्या प्रमाणपत्रांच्या प्रती संबंधीत महाविद्यालयाचा पात्रता तक्ता, १० वी व १२ वीचे बोर्ड प्रमाणपत्र आदी सर्व कागदपत्रे संकलित करूनच सभेला हजर राहावे.

ड) खेलो इंडिया या स्पर्धेचे जाहीर झालेले वेळापत्रक, अखिल भारतीय आणि आंतर विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा, कोविड सदृष्य परिस्थिती आणि शिल्लक राहिलेला कालावधी लक्षात घेता काही खेळांच्या निवड चाचण्या थेट पद्धतीने आयोजित कराव्या लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत सर्व खेळाडूंना त्यांच्या कौशल्य प्रदर्शनाची सुयोग्य संधी प्राप्त होईल. ते ज्या वजन गटात, ज्या स्थानावर अथवा ज्या खेळ प्रकारात आपले कौशल्य प्रदर्शन करणार आहे त्यांना आवश्यक संधी मिळते आहे किंवा नाही याची काटेकोरपणे काळजी पाहणी करणे आणि नंतरच खेळाडूंच्या नावाची शिफारस करणे ही बाब अधिक जबाबदारीची असल्याने निवड समित्यावर आपल्या सेवा देणाच्या सर्व सदस्यांनी ही काळजी घेणे क्रमप्राप्त राहीत.

परिशिष्ट - अ

## १७ ते १८ वर्ष वयोगटातील आणि लसीकरणाची केवळ एक मात्रा पूर्ण झालेल्या खेळाडूकडून आंतर महाविद्यालयीन स्पर्धा/निवड चाचण्या/प्रशिक्षण कालावधीकरिता भरून घ्यावयाचे.

## आवेदन पत्र

मी------------------------------------------------------------------------------------- याद्वारे सविनय विनंती करती/ करते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धा/निवड चाचण्या / प्रशिक्षण वर्गामध्ये सहभागी होण्यास इच्छुक आहे माझी लसीकरणाची एकही मात्रा झालेली नसून / एक मात्रा झालेली असून कोविडमुळे जर मला कुठलीही बाधा अथवा लागण झाल्यास व यामुळे माझी हानी अथवा जिवीत हानी झाल्यास त्याकरिता मी स्वतः जबाबदार राहील. तसेच वरील उपक्रमांमध्ये उपरोक्त परिस्थितीत सहभागी होण्याकरिता माझ्या पालकांची संमती आहे व या प्रमाणपत्रावर त्यांची स्वाक्षरी मी प्राप्त करून घेतलेली असून मला आंतर महाविद्यालयीन स्पर्धा / निवड चाचण्या / प्रशिक्षण वर्गामध्ये सहभागी होण्याची अनुमती प्रदान करावी.

विद्यार्थी/विद्यापीनीची स्वाक्षरी

पालक/अभिभावकाची स्वाक्षरी

महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुखांची/ संचालक स्वाक्षरी

---

परिशिष्ट - ब

## आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा/निवड चाचण्या / प्रशिक्षण वर्ग यांमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूने सहभागी होण्यापुर्वी भरून द्यावयाचे हमीपत्र.

## हमीपत्र

मी-----------------------------------------------------------------------------------याद्वारे हमीपत्र लिहून देतो/देने की राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा/निवड चाचण्या/प्रशिक्षण वर्गामध्ये सहभागी होण्यास इच्छुक असून कोविडमुळे जर मला कुठलीही बाधा अथवा लागण झाल्यास व यामुळे माझी हानी अथवा जिवीत हानी झाल्यास त्याकरिता मी स्वतः जबाबदार राहील. याकरिता महाविद्यालय अथवा विद्यापीठास मी जबाबदार धरणार नाही कुठल्याही नुकसान भरपाईची मागणी करणार नाही. सदर उपक्रमामध्ये मी माझ्या स्वतःच्या आणि पालकांच्या संपूर्ण सहमतीसह सहभागी होत आहे.

विद्यार्थी/विद्यार्थीनीची स्वाक्षरी

पालक/अभिभावकाची स्वाक्षरी

महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुखांची/ संचालक स्वाक्षरी